ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189



सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २३१ • गुरुवार दि.११ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या-कृषीमंत्री भरणे

### अवकाळीग्रस्त शेतपिकांचे पंचनामे दहा दिवसांत पूर्ण करण्याचे शासनाचे आदेश



मुंबई/प्रतिनिधी-मे आणि जून २०२६ मध्ये राज्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी नुकसानीचे पंचनामे काटेकोरपणे आणि वेगाने पूर्ण करून नुकसानभरपाईची प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत.

मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत भरणे बोलत होते. यावेळी पाणीपुरवठा मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार चंद्रकांत पाटील, आमदार अमोल जावळे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसामुळे तब्बल ६१ हजार ४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून त्यापैकी १८ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील असल्याची माहिती भरणे यांनी दिली. विशेषतः ६ जून रोजी झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्याचे अचूक मूल्यमापन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.जळगाव, बुलडाणा, सोलापूर, पुणे, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांमध्ये फळपिकांचे मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. जळगाव जिल्ह्यात मे आणि जून महिन्यात मिळून ७ हजार ५९४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून त्यातील ७ हजार २१६ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन, कृषी व महसूल विभागाने समन्वय साधून पंचनाम्यांचे काम वेगाने पूर्ण करावे, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.भारतीय कृषी विमा कंपनीकडून नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण सुरू असून पुढील दहा पान ४ वर

## एनएसजीच्या तातडीच्या कारवाईने मोठा अनर्थ टळला!

## मुंबईजवळ जिवंत स्फोटकांचा साठा निकामी

मुंबई/प्रतिनिधी-मिरा-भाईंदरमधील उत्तन परिसरात जमिनीत पुरलेला जिवंत स्फोटक गोळा आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र, मिरा-भाईंदर पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षक (एनएसजी) पथकाच्या तात्काळ कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. एनएसजीच्या तज्ज्ञांनी बुधवारी सायंकाळी हा अविस्फोटित स्फोटक गोळा सुरक्षितपणे निकामी केला.

मुंबई जवळ असलेल्या उत्तन परिसरात जमिनीत पुरलेली संशयास्पद धातूची वस्तू नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी प्राथमिक पाहणीत ही वस्तू धोकादायक स्फोटक असण्याची शक्यता ओळखत परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाशी संपर्क साधला.यानंतर एनएसजीचे विशेष तज्ज्ञ पथक घटनास्थळी दाखल झाले. सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करत बुधवारी सायंकाळी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास हा स्फोटक गोळा यशस्वीपणे निकामी करण्यात आला. या संपूर्ण कारवाई दरम्यान कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच एनएसजीकडून मिरा-भाईंदर पोलिसांना आयईडी आणि विविध प्रकारच्या स्फोटकांची ओळख पटविण्यासंदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. त्याच प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष फायदा या घटनेत झाल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी वेळीच धोका ओळखून योग्य यंत्रणांना पाचारण केल्यामुळे संभाव्य दुर्घटना टळल्याची माहिती सूत्रांनी दिली. या घटनेमुळे सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय, सतर्कता आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, कोणतीही संशयास्पद वस्तू आढळल्यास तिला हात न लावता तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन सुरक्षा यंत्रणांकडून करण्यात आले आहे.

## भारतावर उष्णतेचे आणि दुष्काळाचे दुहेरी संकट

### अल-नीनोचे परिणाम

नवी दिल्ली : अल-नीनोच्या वाढत्या प्रभावामुळे भारतासमोर उष्णतेच्या लाटा, कमी पाऊस आणि शेती उत्पादनातील घसरण अशी तिहेरी संकटे उभी राहण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे. असून, त्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या जीवन-मानावर आणि अर्थ-व्यवस्थेवर होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही महिन्यांपासून भारतासह जगभरातील कोट्यवधी नागरिकांना ज्या संकटाची भीती सतावत होती, त्या अल-नीनोचा प्रभाव आता पूर्णपणे सक्रिय झाला असून, येत्या काही महिन्यांत त्याचे गंभीर परिणाम दिसून येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जपानच्या हवामान संस्थेने (जेएमए) दिलेल्या इशाऱ्यानुसार, प्रशांत महासागरातील अल-नीनोची तीव्रता वाढत असून तो पुढील काही महिन्यांत आणखी धोकादायक रूप धारण करू शकतो. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या दिशेने येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे भारतातील तापमानात मोठी वाढ झाली असून अनेक भागांमध्ये पारा ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. त्यामुळे यंदा मार्च ते जुलै या कालावधीत दीर्घकाळ उष्णतेच्या लाटा अनुभवायला मिळण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. भारतात यंदा नैऋत्य मान्सूनचे आगमन उशिराने झाले असून, त्यातच अल-नीनो सक्रिय झाल्याने सरासरीपेक्षा पान ४ वर

## अमेरिका-इराण युद्धात तीन भारतीयांचा मृत्यू

### ओमानमध्ये आणखी एका जहाजावर हल्ला

नवी दिल्ली: मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीचे पडसाद आता भारतीयांवरही उमटू लागले असून, ओमानच्या किनाऱ्याजवळ झालेल्या जहाज हल्ल्यात बेपत्ता झालेल्या तीन भारतीय नाविकांचा मृत्यू झाल्याचे अधिकृतरीत्या स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे देशभरात हळहळ व्यक्त होत असतानाच अवघ्या २४ तासांच्या आत आणखी एका भारतीय जहाजावर हल्ला झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी परिसरातील तणाव दिवसेंदिवस वाढत असून, त्याचा थेट परिणाम आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीवर होत आहे. 'एमटी सेटेबेलो' या पलाऊचा ध्वज असलेल्या व्यावसायिक जहाजावर ओमानच्या किनाऱ्याजवळ झालेल्या भीषण हल्ल्यानंतर तीन भारतीय नाविक बेपत्ता झाल्याची माहिती केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयाने दिली होती. त्यानंतर मोठ्या प्रमाणात शोधमोहीम राबविण्यात आली. मात्र, या शोधकार्यात तीन भारतीयांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

या दुर्घटनेत सुरुवातीच्या बचाव मोहिमेदरम्यान दोन भारतीयांचे मृतदेह हाती लागले होते. केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत, ही भारतासाठी मोठी हानी असून मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशा शब्दांत शोक व्यक्त केला.

दरम्यान, या घटनेची धग शांत होण्यापूर्वीच ओमानमधील शिनास बंदर परिसरात आणखी एका जहाजावर हल्ला झाल्याची माहिती समोर आली. 'एमटी जलवीर' या जहाजावर गुरुवारी (११ जून) झालेल्या हल्ल्यानंतर जहाजाच्या एका भागातून मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्याचे छायाचित्रांमधून दिसून आले. या घटनेची गंभीर दखल घेत भारतीय यंत्रणांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून, ओमानमधील भारतीय दूतावासानेही या हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. ओमानमधील भारतीय जहाजांवर होत असलेल्या सलग हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः परिस्थितीचा आढावा घेतला आहे. मृत नाविकांच्या कुटुंबीयांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन देत केंद्र सरकार त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा दिलासा त्यांनी दिला. तसेच हल्ल्यातून बचावलेल्या नाविकांना सुरक्षितपणे भारतात परत आणण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश संबंधित मंत्रालये आणि अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

## काँग्रेसला लक्ष्य करण्यातच भाजपचं समाधान?

### खा.सुप्रिया सुळेंचा पंतप्रधानांना प्रत्युत्तर



मुंबई/प्रतिनिधी-सतत १२ वर्षे सत्ता उपभोगल्यानंतरही काँग्रेसला लक्ष्य करण्यातच भाजपला समाधान मिळतं का? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा.सुप्रिया सुळे यांनी सत्ताधारी भाजपला विचारला आहे.

सलग सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषविण्याचा विक्रम केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार टीका करत हिंदू विकास दर ही संज्ञा वापरून काँग्रेसने बहुसंख्याक हिंदू समाजावर कलंक लावल्याचा आरोप केला. यावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर देत, १२ वर्षे सत्तेत असूनही भाजपकडून काँग्रेसलाच लक्ष्य केले जात असल्याची टीका केली. सरकारमधील संवेदनशीलता संपली असून घरे आणि पक्ष फोडून सत्तेत आलेल्या भाजपकडून लोकसेवेपेक्षा विरोधकांना बदनाम करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. चुकीची माहिती पसरवून सत्तेत आणणाऱ्या लोकांचाच अपमान केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.पंतप्रधान मोदींच्या काँग्रेसवरील टीकेबाबत विचारले असता सुळे म्हणाल्या, १२ वर्षे सत्तेत राहूनही भाजपला काँग्रेसचं नाव घ्यावं लागत असेल, तर त्यातच काँग्रेसचं यश दडलं आहे. पंतप्रधानांना त्यातून आनंद मिळत असेल, तर त्यापेक्षा काँग्रेससाठी मोठं यश कोणतं असू शकतं? आम्ही १२ वर्षे सत्तेत असतो, तर विरोधकांवर टीका करण्याऐवजी स्वतःच्या कामगिरीबद्दल बोललो असतो.भाजपचा एकही कार्यक्रम किंवा भाषण काँग्रेसचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होत नाही. विरोधकांना सतत लक्ष्य केले जात असेल, तर त्यातून विरोधकांचेच महत्त्व अधोरेखित होते, असा टोला त्यांनी लगावला.यावेळी त्यांनी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरही राज्य सरकारवर निशाणा साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन कर्जमाफीची प्रक्रिया आणि निकष स्पष्ट करावेत, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा लाडकी बहीण योजनेप्रमाणेच पान ४ वर

## हदगाव-गोर्लेगाव रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आमरण उपोषणाचा इशारा

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव तालुक्यातील हदगाव-गोर्लेगाव-बेलमंडळ-गुरफळी या रस्त्याचे सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा गंभीर आरोप करत 'स्वाभिमानी शेतकरी संघटनेने' सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. हे काम अंदाजपत्रकानुसार दर्जेदार पद्धतीने न झाल्यास सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयासमोर थेट आमरण उपोषण करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पंडीतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम उपविभाग हदगावच्या उपविभागीय अभियंत्यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. पाणी न टाकताच रस्त्याची दबाई करण्यात येत असल्याच आरोपही दिलेल्या निवेदनात करण्यात आलेला आहे. निवेदनात नमूद केल्या नुसार, हदगाव-गोर्लेगाव-बेलमंडळ-गुरफळी या रस्त्यावर गिट्टीचा जो थर टाकला जात आहे, त्यात तांबड्या मातीच व निकृष्ट दर्जाची काळ्या ठिसुळ दगडाची गिट्टी वापरली जात आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जी साईट पट्टी (साईट भर) भरली जात आहे, त्यावर कोणत्याही प्रकारचे पाणी न टाकताच रोलरद्वारे दबाई केली जात आहे. पाणी न वापरता होत असलेल्या या कामामुळे हा रस्ता पहिल्याच पावसात वाहून जाण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे .या रस्त्यावरील संजय व्यवहारे यांच्या शेताजवळ एक पूल बांधण्यात येत आहे. या पुलाच्या कामात कॅन्ट्राटदाराने कमालीचा हलगर्जीपणा केला असून, तिथे कोणतेही खोदकाम न करता आणि आवश्यक 'बेड' न टाकताच निकृष्ट दर्जाचे पाईप तसेच ठेवून थेट दोन्ही बाजूंच्या भिंतींचे बांधकाम उरकून घेतले आहे, असा गंभीर आरोप करण्यात आलेले आहे. या प्रकारामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत असून अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.तर पान ४ वर

## २३ कोटींचा पूल उभा,पण जोडरस्ते अधांतरी!;निधीअभावी कापेश्वर-पैनगंगा पुलाचे काम रखडले




माहूर/प्रतिनिधी-मराठवाड्यातील रामपूर मार्गे विदर्भातील कापेश्वरला जोडणारा पैनगंगा नदीवरील महत्त्वाकांक्षी पूल उभारण्यासाठी शासनाने तब्बल २३ कोटी रुपये खर्च केले. मात्र पूल उभा राहूनही जोडरस्ते आणि संरक्षणात्मक कामे अपूर्ण असल्याने हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आजही पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेला नाही. परिणामी विदर्भ-मराठवाड्यातील नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

२०१९ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या पुलाच्या कामास सुरुवात झाली. २०२३ मध्ये काम पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. मात्र त्याच वर्षी पैनगंगा नदीला आलेल्या महापुरामुळे पुलाच्या दोन्ही बाजूंची साईट भरणी, जोडरस्ते आणि संरक्षण भिंतींचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर केवळ तात्पुरती डागडुजी करून वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र कायमस्वरूपी दुरुस्ती आणि उर्वरित कामासाठी आवश्यक असलेला वाढीव निधी अद्याप मंजूर न झाल्याने काम रखडले आहे.सहा वर्षांपासून या पुलाच्या कामाचा बंद-चालू खेळ सुरू असून शासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. पावसाळा तोंडावर आला असतानाही पुलाच्या दोन्ही बाजूंची कामे अपूर्ण असल्याने विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक गावांचा संपर्क पुन्हा धोक्यात आला आहे. शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच रोजच्या प्रवासासाठी या मार्गावर अवलंबून असलेल्या नागरिकांना याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

२३ कोटी रुपये खर्च करून पूल उभारला, पण तो पूर्ण क्षमतेने वापरता येत नसेल तर त्या खर्चाचा उपयोग काय? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. विकासकामांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करूनही मूलभूत सुविधा अपूर्ण राहात असतील तर शासनाच्या विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.रखडलेल्या कामामुळे भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत. पावसाळ्यात पुन्हा पूरस्थिती पान ४ वर

# अमेरिका-इराण संघर्षाचे वाढते सावट

मध्यपूर्वेतील राजकीय आणि लष्करी घडामोडींनी पुन्हा एकदा जागतिक समुदायाचे लक्ष वेधून घेतले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढता संघर्ष नव्या टप्प्यावर पोहोचल्याचे अलीकडील घटनांवरून दिसून येत आहे. अमेरिकेने इराणमधील काही लष्करी आणि अणुस्थळांवर हवाई कारवाया केल्याचा दावा केला असून, त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने अमेरिकेच्या हितसंबंधांवर हल्ले करण्याचा इशारा दिला आहे. या घडामोडींमुळे मध्यपूर्वेत युद्धाचे ढग अधिक गडद झाले असून त्याचे परिणाम केवळ या प्रदेशापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर संपूर्ण जगाला त्याची झळ बसण्याची शक्यता आहे.अमेरिका आणि इराण यांच्यातील वैराचे मूळ अनेक दशकांपूर्वीचे आहे. १९७९ मधील इस्लामी क्रांतीनंतर दोन्ही देशांतील संबंध सातत्याने तणावपूर्ण राहिले आहेत. अणु कार्यक्रम, आर्थिक निर्बंध, आखाती प्रदेशातील वर्चस्व आणि इस्रायलच्या सुरक्षेचा प्रश्न या मुद्द्यांमुळे संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. इराणवर अण्वस्त्र निर्मितीच्या दिशेने वाटचाल केल्याचा आरोप अमेरिका आणि तिचे मित्रदेश करीत असले तरी इराण हा कार्यक्रम शांततामय उद्देशांसाठी असल्याचे सांगत आले आहे. मात्र दोन्ही बाजूंमधील अविश्वास इतका वाढला आहे की, प्रत्येक घडामोड संघर्षाला आणखी खतपाणी घालत आहे.नुकत्याच झालेल्या हल्ल्यांमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. अमेरिकेने इराणच्या हवाई संरक्षण यंत्रणा, नियंत्रण केंद्रे आणि काही लष्करी तळांवर लक्ष्य साधल्याचे वृत्त आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने आखाती प्रदेशातील अमेरिकन तळ तसेच अमेरिकेच्या मित्रदेशांवर दबाव वाढविण्याची रणनीती स्वीकारल्याचे संकेत दिले आहेत. बहरीन, कुवेत, जॉर्डन आणि इराकमधील अमेरिकन तळांवर हल्ल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे संघर्षाचा विस्तार होण्याचा धोका वाढला आहे.या संघर्षाचे सर्वात गंभीर परिणाम ऊर्जा सुरक्षेवर होऊ शकतात. जगातील मोठ्या प्रमाणावरील तेलवाहतूक होर्मुझ सामुद्रधुनीतून होते. या मार्गावर तणाव वाढल्यास तेल पुरवठा विस्कळीत होऊ शकतो. परिणामी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती वाढतील आणि महागाईचा दबाव निर्माण होईल. रशियायुक्रेन युद्धामुळे आधीच अस्थिर झालेल्या जागतिक अर्थव्यवस्थेसाठी हा आणखी एक मोठा धक्का ठरू शकतो. विकसनशील देशांसाठी ही परिस्थिती विशेषतः चिंताजनक आहे. भारतासाठीही या संघर्षाचे परिणाम महत्त्वाचे ठरणार आहेत. भारत आपल्या ऊर्जा गरजांसाठी मोठ्या प्रमाणावर तेल आयातीवर अवलंबून आहे. तेलाच्या किंमती वाढल्यास इंधन दर, वाहतूक खर्च आणि उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होईल. तसेच आखाती देशांमध्ये लाखो भारतीय काम करतात. संघर्ष तीव्र झाल्यास त्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे भारताला संतुलित आणि सावध परराष्ट्र धोरण स्वीकारावे लागणार आहे.या संघर्षाचा आणखी एक धोकादायक पैलू म्हणजे त्याचे प्रादेशिक युद्धात रूपांतर होण्याची शक्यता. इराणशी संबंधित विविध सशस्त्र गट लेबनॉन, सीरिया, इराक आणि येमेनमध्ये सक्रिय आहेत. दुसरीकडे इस्रायल, अमेरिका आणि त्यांच्या सहयोगी देशांची भूमिका अधिक आक्रमक होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत एखादी छोटी घटना किंवा चुकीचा अंदाज व्यापक युद्धाचे कारण ठरू शकतो. इतिहासात अशा अनेक संघर्षांनी सुरुवातीला मर्यादित स्वरूप घेतले, परंतु नंतर त्यांनी संपूर्ण प्रदेशाला अस्थिर केले आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर काही राष्ट्रांच्या भूमिकाही महत्त्वाच्या ठरतात. संयुक्त राष्ट्रसंघ, युरोपीय महासंघ, चीन आणि रशिया यांसारख्या शक्तींनी शांततेसाठी अधिक सक्रिय प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ लष्करी कारवाया आणि प्रतिहल्ले यामुळे समस्येचे निराकरण होणार नाही. संवाद, वाटाघाटी आणि विश्वासार्ह राजनैतिक प्रक्रिया यांच्याद्वारेच दीर्घकालीन तोडगा शक्य आहे. संघर्षाचा विस्तार रोखणे ही आजच्या घडीची सर्वात मोठी गरज आहे.आज जग एका संवेदनशील वळणावर उभे आहे. अमेरिकाइराण संघर्ष हा दोन राष्ट्रांमधील वाद राहिलेला नसून तो जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य आणि ऊर्जा सुरक्षेशी संबंधित प्रश्न बनला आहे. युद्धाच्या ज्वाळा भडकण्यापूर्वी त्या विझविण्याची जबाबदारी सर्व संबंधित देशांवर आहे. विवेक, संयम आणि संवाद यांनाच प्राधान्य दिले गेले तरच मध्यपूर्वेत शांततेचा मार्ग खुला होईल. अन्यथा या संघर्षाची किंमत संपूर्ण जगाला मोजावी लागू शकते.


# शाळा सुरु करायचीय ; संभ्रम कायम

अंकुश शिंगाडे
नागपूर

शिक्षक बरीच कामं करतात. कधी बि एल ओ तर कधी जनगणना. कधी कोरोनात काम तर कधी प्रशिक्षण देण्याघेण्याचं काम. ही कामं उन्हाळ्यात सुट्या असल्या तरी सुरु असतात. भर उन्हाचा व शिक्षकांनाही उन्हाचा त्रास होईल व तो त्रास सहन होणार नाही याचा विचार न करता. ज्यातून बरीचशी शिक्षक मंडळी मरण पावतात. दि. १५ जून, जून महिना. ज्या दिवशी शाळा सुरु करायची असा शासनाचा शासन निर्णय. ज्या दिवशी शाळा सुरु होतील. कुठल्या तर त्याला उत्तर आहे, महाराष्ट्रातील. ज्यातून उन्हाळी सुट्ट्या पुष्कळ झाल्या. विद्यार्थ्यांचं नुकसान व्हायला नको म्हणून शासनानं हा निर्णय घेतलाय. परंतु हा निर्णय विदर्भाला मान्य नाही. विदर्भातील मंडळी म्हणतात की दि. १५ जूनपासून शाळा सुरु केल्यास विदर्भातील तापमान कितीतरी प्रमाणात जास्त असल्यानं त्याचा त्रास विद्यार्थ्यांना होणार. म्हणूनच खटले आणि न्यायालयातून निर्णय. तरीही दरवर्षी शाळा सुरु करण्याबाबत संभ्रम आणि तापमानाचा जोर कायमच असतो.

पुर्वी असं नव्हतं. पुर्वी शाळा सुरु करण्याबाबत निश्चित तारीख होती व दरवर्षी शाळा या सव्वीस जुनलाच फुरु व्हायच्या. परंतु आता शाळेला ग्रहण लागल्यासारखं वाटतंय. ज्यातून टि ई टी आणली. एवढंच नव्हे तर अलिकडील दोनचार वर्षाच्या काळात शाळेच्याच सुरु करण्याच्या तारखेबाबत शासनाच्या धोरणात संभ्रम असतो. कधी शाळा या बारा जुनला तर कधी शाळा या पंधरा जुनला सुरु करण्याचा धाट असतो. शासन शाळा या ढर उन्हाळ्यातच सुरु करु म्हणतात. तसं पाहिल्यास शासनाला शाळा या वर्षभर सुरु असाव्यात असंच वाटत असेल. यात शंका नाही. शाळा व त्या सुरु करण्याबाबत विचारांचा घोळ. ज्यात दरवर्षी महिनाभर विचार विमर्श चालतो. शाळा या वर्षभरच सुरु असाव्यात असं वाटतं. त्याचं कारण आहे, शिक्षकांचे वाढलेले वेतन. तेच शासनाच्या मनात खलत असतं. म्हणूनच शाळा या वर्षभर सुरु राहाव्यात असं शासनाला वाटतं. परंतु पर्याय नसतो. उन्हाळा असतो व उन्हाळ्यात उन्हाची तीव्र दाहकता असते. वाटतं की विद्यार्थी शाळेत नक्की येईल. परंतु त्यांची प्रकृती बिघडायला नको. म्हणूनच नाईलाजास्तव शाळा या विदर्भातील तापमान पाहता दरवर्षी बदलाव्या लागतात. ज्याला इलाज नसतो. कारण शाळा या पंधरा जुनला वा बारा जुनला सुरु करायची. हा विचार पाहून सुर्यही खवळतोय. तो मग आग जास्त ओकू लागतोय. याचाच अर्थ असा की ज्या गोष्टी नव्हे तर विद्यार्थ्यांच्या भावना ज्या सुर्याला समजतात. त्या गोष्टी शासनाला का समजत नाही. ही शोकांतिकाच आहे व यावर खऱ्या अर्थानं विचार करण्याची गरज आहे. सुर्य खवळतोय विदर्भातील शाळा पंधरा जुनला सुरु होत आहे हे समजून? असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण अलिकडील काळातील दोन चार वर्षामध्ये दरवर्षी शासन पंधरा जुनला शाळा सुरु करण्याचा विचार करतं आणि नेमकँ त्याच वर्षी विदर्भातील तापमान एवढं वाढतं की सरकारला आपला निर्णय बदलावाच लागतो. ज्यासाठी न्यायालयात खटलाही दाखल करावा लागतो. मग सर्वोच्च न्यायालय निर्णय देतं. निर्णय देतं की विदर्भातील तापमान सर्वोच्च आहे. अशा वातावरणात विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळू नका. शाळा सव्वीस जूनला सुरु करा. मग शाळा सव्वीस जुनला सुरु होतात.

सन २००७ चा तो काळ. ज्यावेळेस शासन शाळा या बारा जूनला सुरु करु म्हणत होतं. त्यावेळेस लोकँसर्वोच्च न्यायालयात गेले. तेव्हाही अशीच शासनाची मते मतांतरे होती. तशीद जिद्द होती की शाळा या बारा जूनलाच सुरु करु. मात्र त्यावर सर्वोच्च न्यायालयानं त्यावेळेस निर्णय दिला. निर्णय दिला की शाळा या विदर्भातील तापमान जास्त असल्यानं तापमानाचा अंदाज घेवून सुरु कराव्यात. त्यावेळेस बहुतांश अंदाजे एक जुलैला शाळा सुरु झाल्या. असं मला वाटते. शाळा पंधरा जुनला सुरु कराव्यात. असं शासनाचं मत. का सुरु कराव्यात? याचं उत्तर विद्यार्थी शिकला पाहिजे. खरंच वर्षभर शाळेत येवून जे विद्यार्थी सर्वकष ज्ञान प्राप्त करीत नाही. तेच विद्यार्थी उच्चतम तापमानात शाळेत येवून खरे ब्रीद शिकू शकतील काय? यावर विचार करण्याची गरज आहे. त्यातच काही खाजगी महाभाग अर्थातच कॉन्व्हेंटवाले वा खाजगी शिकवणी वर्गवाले असे आहेत की जे विद्यार्थ्यांच्या




जीवनाशी खेळत भर उन्हाळ्यातही शाळा ठेवतात व पालक आपल्या मुलांना त्या शाळेत वा खाजगी शिकवणी वर्गात पाठवतातच. हेच शासनाच्या लक्षात आलं व शासनही तोच प्रताप करायला पाहतो. परंतु याबाबत विशेष सांगायचं झाल्यास ज्या खाजगी शिकवणी देणाऱ्या संस्था वा शाळा वा शिकवणी वर्ग. ज्या वर्षभर विद्यार्थ्यांना शाळेत बोलावतात. त्या संस्थेत वा शिकवणी वर्गात ज्या पायाभूत सुविधा असतात. त्या अतिशय उत्कृष्ट दर्जाच्या असतात. अर्थातच प्रत्येक वर्गखोलीत एसी लागलेला असतो. कुलरची तरी व्यवस्था असते आणि त्या व्यवस्था या विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या शिकवणी शुल्कातूनच केलेल्या असतात. परंतु शाळेचा आणि सरकारी शाळेचा विचार केल्यास ज्या शाळेत बरोबर शौचालयाच्या सुविधा नाहीत. तिथे पंखे, कुलर वा एसीचा विचार कसा करता येईल बरं? साधे पंखे सुद्धा बऱ्याच शाळेत नाहीत. तिथं कुलर वा एसीचा विचार न केलेला बरा. अशी शाळेची अवस्था. त्यातच बऱ्याचशा संख्येनं जास्त शाळा. अशा अवस्थेत शाळेत विद्यार्थ्यांना पंधरा जुनला पाठवताच विद्यार्थ्यांचे हाल कसे होतील. याबाबत विचार न केलेला बरा. थोडा थंडावा आल्यास व शाळा सुरु केल्यास बरं नाही का? परंतु शासन ऐकेल तेव्हा ना. यासाठीच दरवर्षी लोकांना न्यायालयात जावं लागतं. राहिला वेतनाचा प्रसंग. जे शिक्षकांचे वाढलेले वेतन शासनाच्या मनात खलतं. ज्यातून उन्हाळ्यात सुद्धा फुकटचं शिक्षकांना वेतन द्यावं लागतं असं सरकारला वाटतं. ज्यातून शिक्षकांची गाळणी करण्यासाठी टि ई टी आणली. ज्या टि ई टी परीक्षेतील प्रश्नांचा व शिक्षकांच्या अनुभवाचा दूरदूरचा संबंध नाही.

संभ्रम...शाळेचा शेवटचा वर्कींग दिवस ठरवतांना संभ्रम. त्यातच शाळा नेमक्या केव्हा सुरु कराव्यात याबाबत संभ्रम. ज्यात एक निश्चित तारीख असावीच. जशी पुर्वी नेमकी तारीख होती, सव्वीस जुन. परंतु आता नेमकी शाळा केव्हा सुरु करायची. हे कळत नाही. ज्यात दरवर्षी संभ्रमच असतो शासनाच्या मनात. दरवर्षीच तारखा बदलत असतात आणि सव्वीस जुनच्या नंतरच शाळा सुरु होत असतात. विदर्भात तर असंच घडतं. शाळा निश्चितच सव्वीस जुनच्या नंतरच सुरु होत असतात. असं असतांना शाळेच्या तारखेबाबत संभ्रम का पडावा दरवर्षी? दरवर्षीच न्यायालयात का जावं लागावं लोकांना शाळा सुरु करण्याच्या तारखेचं निश्चीतीकरण करण्यासाठी? एक नेमकी तारीख का नसावी? वैगेरे प्रश्न अनिश्चित आहेत. कधी शासन जे पेपर घेतं. त्या पेपरची तारीख बदलवली जाते तर कधी सुट्टीच्या तारखेबाबत घोळ असतो. कधी शासन जे जी आर काढतात. तेही बदलवावे लागतात. असं का होतं? इथं शाळा लवकर सुरु करीत असतांना जे शिक्षकांना उन्हाळ्यात देय असलेले वाढीव वेतन खलतात शासनाला. त्याच धर्तीवर सांगावेसे वाटते की त्यांच्या मनात त्यांचेच वाढलेले वेतन का खलत नाही? आमदार, खासदार व मंत्रीमंडळांचे वाढलेले वेतन का खलत नाही? तसेच एसीच्या कमऱ्यात बसून अक्कल सांगणाऱ्या व सर्वतोपरी विषयांकीत निर्णय घेणाऱ्या शासनानं जरा शिक्षकी व विद्यार्थी जीवनात येवून बघावं आणि त्यांना पंधरा जुनला शाळा सुरु झाल्यावर होणारा त्रास अनुभवावा म्हणजे कळेल, त्यांची अवस्था. विना पंख्यानं वर्गखोलीत शिकायला बसतांना कोणता त्रास होतोय ते. काही आदिवासी भाग असेही आहेत की त्या भागात आजही शाळेसाठी प्रशस्त इमारत नाही. पायाभूत सुविधांची गोष्टच वेगळी. वर टिनाचे शेड आहेत वा कवेलूच्या शाळा. आजुबाजूला झाडं जरी असली तरी त्यांची हवा ही परीसरातील उष्णता शरीराला पोषक असलेल्या पाहिजे त्या प्रमाणात शोषून घेत नाही. उरला प्रश्न शहरी भागातील तर शहरी भागात जे सिमेंटचं बांधकाम झालं. त्यानं जी उष्णता वाढली. ती उष्णता एसी लावला तरी कमी करता येत नाही आणि एसी लावलाही. तरी त्यातून जेव्हा मनुष्य सरळ बाहेर उन्हात येतो. तेव्हा आपली प्रकृती बिघडल्याशिवाय राहात नाही. याचाच अर्थ असा की पंधरा जुनला शाळा सुरु करणे म्हणजेच विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळणेच होय. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे शासनानं दरवर्षी अशी तारख बदलविण्यापेक्षा पुर्वीसारखीच शाळा सुरु करण्याची एक निश्चित तारीख करावी. ते विद्यार्थी हिताच्या दृष्टीकोनातून करावं. ते महत्वाचं. विद्यार्थी हित शासन पाहात असेल तर...... उर आ शिक्षकांचा प्रश्न तर शासन दरवर्षीच काही ना काही प्रकारानं शिक्षकांना उन्हाळ्याच्या सुट्टीतही राबवीत असतं. कधी बी एल ओचं काम देवून. कधी एखादं प्रशिक्षण लावून तर कधी एखादी कोणत्याही स्वरुपाची ड्युटी लावून. जशी यावर्षी भर तीव्र उन्हाळ्यात जनगणनेची ड्युटी लावली. जशी कोरोनातही भर उन्हाळ्यातच चुंगी नाक्यावर येणाऱ्या वाहनातील कोरोनायुक्त रुग्णांना तपासायची ड्युटी लावली होती. त्या ड्युट्या शिक्षक करतातच, शासनाचं काम आहे हे समजून. आपला जीव धोक्यात घालून. ज्यात त्यांचा जीवही जात असतो. जसे कोरोनात काही शिक्षक मरण पावले. जसे यावेळेस जनगणनेतही काही शिक्षक उन्हाळ्याचा त्रास सहन न झाल्यानं मरण पावले.

महत्वाचं सांगायचं झाल्यास शासन शिक्षकांचा विचार न करता पंधरा जुनला शाळा सुरु करु पाहात होते. ती तारीख बावीस झालेली असून तिही तारीख पुढे बदलू शकते. त्यामुळंच अशा भानगडी करण्यापेक्षा शासनानं जी निर्धारीत शाळा सुरु करण्याची तारीख सव्वीस जुन निश्चित केली आहे. तीच ठेवल्यास काहीच समस्या उद्भवत नाही. उद्भवू शकत नाही. राहिला शिक्षकांचा प्रश्न तर सरकारी शाळेतील ग्रामीण भागातील शिक्षक आणि खाजगी अनुदानीत शाळेतील शिक्षकही शासनाचं उन्हाळ्यात वेतन मिळत नसतांनाही ढर उन्हाळ्यातच नाही तर वर्षभर शाळेत जातात. शाळा प्रवेशाचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नव्हे तर अलिकडील काळात कॉन्व्हेंटच्या वाढत्या प्रस्थांमुळे शासनाच्या सरकारी, अनुदानीत शाळेत विद्यार्थी मिळत नाही. परंतु शाळा टिकायला हव्यात. विद्यार्थी यायलाच हवेत. विद्यार्थी आहेत तर आपण आहोत. या भावनेनं भावनेनं. खरं तर हीच गोष्ट वाखाणण्याजोगी आहे. परंतु ही गोष्ट पडद्याआड घडत असल्यानं एखाद्या चित्रपटासारखी गोष्ट शिक्षकांच्याही जीवनात घडते. चित्रपटात नायक समोर असल्यानं लोकांच्या लक्षात तोच राहतो. परंतु त्या नायकाला उभं करण्यासाठी जो व्यक्ती दिग्दर्शक व निर्माता रुपात पडद्याआड असतो. खरं तर त्याच्याचमुळं चित्रपट दर्जेदार बनतो व पाहायला हवाहवासा वाटतो. अगदी तसंच शिक्षकांचही जीवन आहे. शासन नायक आहे व शिक्षक पडद्याआडचा दिग्दर्शक आणि निर्माता. ज्यातून तो काहीच करीत नाही. हे इतर लोकांना वाटतं. परंतु लोकँचित्रपटासारखं नेमकँतेच विसरतात की तोच खरा कलाकार आहे की जो विद्यार्थ्यांच्या जीवनात रंगत आणतो. शासन रुपातील एसीच्या कमऱ्यात बसून निर्णय घेणारे नायक विद्यार्थी जीवनातील चित्रपटाला रंगत आणत नाहीत.

# यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संघटनेची कार्यकारणी घोषित

## अध्यक्षपदी विजयानंद भुतडा तर सचिवपदी डॉ.दिनेश चांडक यांची नियुक्ती

उमरखेड/प्रतिनिधी- यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संघटनेची जिल्हा कार्यकारिणी २६ जून रोजी उमरखेड येथील सेठ गो.से. सारडा राजस्थानी भवन मध्ये झालेल्या बैठकीत निर्विरोध गठीत करण्यात आली. ही कार्यकारिणी २०२६ ते २९ पर्यंत असेल. यामध्ये अध्यक्षपदावर विजयानंद भुतडा, तर सचिवपदी डॉ. दिनेश चांडक यांची नियुक्ती करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षपदी निवर्तमान अध्यक्ष मनोहरलाल लड्ढा तर प्रमुख अतिथी सचिव डॉ. प्रशांत मोदानी होते, या शिवाय व्यासपीठावर निवडणूक पर्यवेक्षक प्रदेश माहेश्वरी संघटनेचे सचिव अजय मोदानी निवडणूक अधिकारी अरुण अटल, एडवोकेट श्याम भट्टड, मनोज माहेश्वरी, विनोद तेला उपस्थित होते. दिप प्रज्वलन व महेश वंदना ने कार्यक्रमाची सुरवात झाली. कार्यक्रमात सर्व



पदासाठी एक एकच नामांकन आल्याने अध्यक्ष म्हणून उमरखेडचे विजयानंद भुतडा तर सचिव पदी यवतमाळ येथील डॉ.दिनेश चांडक, उपाध्यक्षपदी दिग्रस येथील दिनेश लड्डा, कोषाध्यक्षपदी पुसद येथील सतीश भंडारी तर प्रचार प्रसारमंत्री राजेश माहेश्वरी, सहसचिव प्रीतम राठी, संघटन मंत्री पदावर संजय मंत्री यांची निर्विरोध निवड करण्यात आली. या सभेसाठी जिल्ह्यातील यवतमाळ, दारव्हा, दिग्रस, पुसद ,उमरखेड आणि बाभूळगाव तालुक्यातील समाजाचे पदाधिकारी सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संदीप भट्टड तर आभार गोपाल भराडे यांनी मानले या सभेचे उपस्थित यशस्वीतेसाठी उमरखेड माहेश्वरी संघटनेच्या सर्व पदाधिकारी सदस्य समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

### पुढील तीन वर्षात सेवक बनून कार्य करेल-विजयानंद भूतडा

नवनियुक्त अध्यक्ष विजयानंद भूतडा यांनी सांगितले की, मी अध्यक्ष नाही तर सेवक बनून कार्य करेल तसेच येत्या तिन वर्षात आपण प्रत्येक कार्या चे योग्य नियोजन करुन नंतर त्यावर विचारविनिमय करून तो अमलात कसा येइल यावर कार्य करु असे मत व्यक्त केले.

# समता पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अरविंद जाधव यांची बिनविरोध निवड

माहूर/प्रतिनिधी-किनवट- माहूर तालुक्यातील सहकार क्षेत्रातील नावाजलेल्या समता जिल्हा परिषद शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, किनवट- माहूरच्या अध्यक्षपदी शिक्षक भारती संघटनेचे माहूर तालुकाध्यक्ष अरविंद जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी सचिन कोंडापलकुलवार तर सचिवपदी भुजंग मसराम यांची एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी संचालक राजू वाघमारे, गजानन निलकंठवार, शिवराज मुंडे, अश्वत घुले, राम बुसमवार, शमशेर खान, लतिका राठोड, कविता तोटावार, बंडू जाधव, विनोद गुरनुले तसेच संस्थेचे व्यवस्थापक संजय कचकलवार उपस्थित होते.भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत कुणके यांच्यासह अमोल कुलकर्णी, जगजीतसिंघ ठाकूर, बालाजी गादगे, अजय राठोड, संतोष चव्हाण, रमेश चव्हाण, भगवान गायकवाड, प्रेम जाधव, वसंत राठोड, संजीत मुनेश्वर, ललिता जोशी, सुभाष चलवदे, रोहित जाधव, कांबळे, सतीश कुरमे, उत्तम पवार व ज्ञानेश्वर चव्हाण यांनी अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.निवड प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार अधिकारी दीपक चव्हाण यांनी कामकाज पाहिले. नवीन कार्यकारिणीच्या निवडीमुळे संस्थेच्या प्रगतीला अधिक गती मिळेल तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हितासाठी प्रभावीपणे कार्य करण्यात येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# खैरका येथील युवकाचा खून

मुखेड/प्रतिनिधी-येथून जवळच असलेल्या खैरका येथील ज्ञानेश्वर नारायण श्रीरामे (वय ४५) यास आरोपिनी जबर मारहाण करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना बुधवारी घडली आहे. या घटनेमुळे मुखेड शहर व खैरका परिसरात खळबळ उडाली आहे.यातील आरोपी गजानन माणिका सादगीर व आप्पाराव बालाजी सूर्यवंशी दोघेही रा. खैरका यांना अटक केली आहे.

मयत ज्ञानेश्वर श्रीरामे हा बुधवारी ज्वारी विकण्यासाठी मुखेड येथील मोंढ्यात आला होता. तो आडत दुकानावर असताना, त्यांच्याच गावातील वरिल दोघा आरोपिनी त्यास गाडीची स्टेपनी चोरल्याच्या संशयावरून त्याचे हातपाय बांधून जबर मारहाण केली.त्याच अवस्थेत त्याला दुपारी अंदाजे १:३० वाजण्याच्या सुमारास एक चारचाकी वाहन (क्र.MH 24-AB 7435) येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करून पोबारा केला. रुग्णालयातील डॉ. उमाकांत गायकवाड यांनी ज्ञानेश्वर श्रीरामे यांना तपासून तात्काळ 'मृत' घोषित केले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी उपजिल्हा रुग्णालयात धाव घेऊन मृतदेहाचा पंचनामा केला. मयत ज्ञानेश्वर यांची बहीण शशिकला यादव देवकते यांच्या फिर्यादीवरून आरोपी गजानन सादगीर व आप्पाराव सूर्यवंशी यांच्यावर मुखेड पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. अवघ्या चार तासात यातील आरोपिना अटक केल्याबद्दल मुखेडचे नूतन पोलीस निरीक्षक चिताम्बर कमठेवाड, सपोनि गणेश माने व पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.

# देगलूरच्या उपजिल्हा रुग्णालयात १५ जूनला गोंधळ आंदोलनाचा इशारा

## रुग्णालयातील गैरहजेरीवर शिवसेना ठाकरे गट आक्रमक

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची कथित गैरहजेरी, रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याची समस्या तसेच मंजूर असलेले १०० खाटांचे रुग्णालय तातडीने कार्यान्वित करण्याच्या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने १५ जून रोजी उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात गोंधळ आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.यासंदर्भातील निवेदन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरेवाड यांना सादर करण्यात आले आहे.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. देगलूर हे तेलंगणा आणि कर्नाटक सीमेलगतचे शहर असून या परिसरात गरीब, दलित, शेतकरी, शेतमजूर तसेच आदिवासी समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी तत्कालीन आमदार सुभाष साबणे यांच्या कार्यकाळात १०० खाटांच्या रुग्णालयास मंजुरी मिळाली होती. मात्र, तब्बल आठ वर्षांचा कालावधी उलटूनही या रुग्णालयाचे प्रत्यक्षात रूपांतर झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.दरम्यान, आमदार जितेश अंतापूरकर यांनी पुन्हा नव्याने १०० खाटांच्या रुग्णालयास मंजुरी मिळाल्याचे जाहीर केले असले, तरी अद्यापही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयात एकूण १२ वैद्यकीय अधिकारी नियुक्त असतानाही दररोज केवळ एकच अधिकारी सेवा देत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. उर्वरित अधिकारी खासगी दवाखान्यांमध्ये अधिक लक्ष देत असल्यामुळे शासकीय रुग्णालयातील रुग्णांना आवश्यक उपचार मिळत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परिणामी, अनेक रुग्णांना खासगी रुग्णालये किंवा नांदेड येथे जाऊन उपचार घ्यावे लागत असून त्यातून आर्थिक, शारीरिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे.सर्व वैद्यकीय अधिकारी नियमितपणे हजर राहून नागरिकांना आरोग्य सेवा द्यावी आणि मंजूर असलेले १०० खाटांचे रुग्णालय तातडीने सुरू करावे, या प्रमुख मागण्यांसाठी १५ जून रोजी उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात गोंधळ आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, पांडुरंग पाटील थडके देगावकर, भगवान जाधव, भागवत पाटील सोमुरकर, विनोद सोनकांबळे आदींच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन जिल्हा शल्यचिकित्सकांना देण्यात आले.

# उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत १० लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबविलेल्या विशेष मोहिमेत १४० प्रतिबंधात्मक कारवाया करून १० लाख ७२ हजार ८८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक एस. एल. कदम यांनी दिली.पुणे-फुगेवाडी येथे मिथेनॉल मिश्रित हातभट्टी दारू सेवनामुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात २९ मेपासून अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली. तसेच २ जूनपासून हातभट्टीमुक्त नांदेड जिल्हा मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले होते.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, सहआयुक्त आणि विभागीय उपआयुक्त यांच्या निर्देशानुसार अधीक्षक एस. एल. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील निरीक्षक, दुय्यम निरीक्षक आणि भरारी पथकांनी २९ मे ते ८ जून या कालावधीत ही कारवाई केली.या कालावधीत एकूण १४० गुन्हे नोंदविण्यात आले असून १३७ वारस प्रकरणे दाखल करण्यात आली. १४२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान १ हजार ९८ लिटर हातभट्टी दारू, १३१२० लीटर रसायन, २४२.२६ लिटर देशी मद्य, ८.१० लिटर विदेशी मद्य, ३ लिटर बिअर आणि १ हजार ७४६ लिटर ताडी जप्त करण्यात आली. याशिवाय तीन वाहनेही जप्त करण्यात आली.सराईत गुन्हेगारांविरोधातही विशेष कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ९३ अंतर्गत ३९ प्रकरणे दाखल करण्यात आली असून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र दिल्यानंतरही गुन्हे करणाऱ्या सहा आरोपींविरुद्ध बंधपत्र उल्लंघनाची कारवाई करण्यात आली आहे. अशा आरोपींना हद्दपार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.तसेच महाराष्ट्र प्रतिबंधक धोकादायक कृती कायदा (एमपीडीए) अंतर्गत एका आरोपीविरुद्ध कारवाई करून त्याला थेट कारागृहात पाठविण्यात आले आहे.



युवा सेनेचे विभागीय सचिव महेश खेडकर यांच्या वतीने त्यांच्या दिग्वीजय निवासस्थानी सडेतोड विभागस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, या स्पर्धेत आपले मत मांडतांना तरुणी. यावेळी परिक्षक राम चव्हाण, भोसीकर, शिवसेना महानगरप्रमुख मनोज यादव, तालुकाप्रमुख सुनिल कदम, युवा सेनेचे रवि नागरगोजे, सचिन पाटील, सौरभ देवकते, करण इटनकर, विलास कल्याणे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# देगलूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) कॅडेट संगमेश्वर बोडके आणि मनीष बकरे यांची भारतीय सैन्य दलातील आर्मी जीडी (जनरल ड्युटी) पदासाठी निवड झाली असून त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



यावर्षी देगलूर महाविद्यालयातील एकूण चार विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात, तर चार विद्यार्थ्यांची पोलीस दलात निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून ही बाब संस्था आणि परिसरासाठी अभिमानाची मानली जात आहे. तसेच या यशामुळे इतर युवकांनाही संरक्षण व पोलीस सेवेत करिअर घडविण्याची प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार तसेच संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

# महावितरणकडून शेतकऱ्यांना ८.८१ कोटी रुपयांचा परतावा

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात कृषी वीज जोडणीसाठी डिमांड भरलेल्या, परंतु सरकारच्या सौरऊर्जा कृषी धोरणाचा भाग म्हणून किंवा इतर अनेक कारणांस्तव वीज जोडणी न झालेल्या १०८८५ प्रलंबित कृषी ग्राहकांना महावितरणकडून नियमानुसार ८,८१,५५,०३५ रुपयांच्या धनादेशांचे परतावा म्हणून वितरण करण्यात आल्याची माहिती नांदेड मंडल कार्यालयामार्फत कळविण्यात आली आहे. नांदेडसह राज्यात सर्वत्र पारंपरिक कृषी वीज जोडण्याऐवजी सौर कृषीपंप जोडण्या देण्याचे धोरण आहे. मागच्या काळात काही कृषीपंप धारकांनी जोडणीसाठी डिमांड म्हणून पैसे भरलेले होते, परंतु सौरऊर्जा धोरणामुळे किंवा इतर काही कारणांमुळे पैसे भरलेल्यांपैकी सुमारे १०८८५ शेतकऱ्यांना जोडण्या देण्यात आलेल्या नाहीत. तशा प्रलंबित कृषीग्राहकांना महावितरणने नियमानुसार ८,८१,५५,०३५ रुपयांचा धनादेशाव्दारे परतावा दिलेला आहे. अद्यापही उर्वरित काही शेतकऱ्यांना परताव्यांचे पैसे देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# अधिकमासानिमित्त अनुसया माता मंदिरात धोंडे जेवण महाप्रसादाचे आयोजन

माहूर/प्रतिनिधी-भगवान श्री दत्तात्रेय प्रभूंचे जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या अनुसया माता मंदिर येथे अधिकमासानिमित्त गुरुवार, दि.१२ रोजी धोंडे जेवण महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दत्तशिखर संस्थान चे महंत डॉ. धनेश्वर भारती महाराज (गुरु मधुसूदन भारती महाराज) यांच्या कृपाशीर्वादाने हा धार्मिक कार्यक्रम संपन्न होत आहे.

अधिकमास हा धार्मिक दृष्ट्या अत्यंत पुण्यदायी मानला जात असल्याने, या निमित्ताने दसनाम संन्यासी संतांच्या वतीने भाविकांसाठी धोंडे जेवण महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला विविध संत, महंत, साधू-संत तसेच दत्तभक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिदेवांचा अवतार मानल्या जाणाऱ्या भगवान श्री दत्तात्रेय प्रभूंच्या जन्मभूमी असलेल्या माहूरच्या पावन भूमीत हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमादरम्यान भाविकांना दर्शन, पूजन आणि महाप्रसादाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. सर्व भाविक भक्तांनी अधिकाधिक संख्येने उपस्थित राहून धोंडे जेवण महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दत्तशिखर संस्थान व दसनाम संन्यासी संत मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पीपल्स कॉलेज एन.सी.सी.विभागाच्या दोन विद्यार्थ्यांची सैन्यदलात निवड

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेजचा माजी विद्यार्थी परमेश्वर राठोड व नुकताच पदवी तृतीय वर्गाची परीक्षा दिलेला विद्यार्थी प्रशांत वाघोळे यांची भारतीय सैन्यदलात अग्निवर म्हणून निवड झाली आहे.

परमेश्वर राठोड व प्रशांत वाघोळे या विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून सैन्य दलाची आवड होती. सैन्य दलात जाण्यासाठी अभ्यासाबरोबर दररोज शारीरिक व्यायाम करून शरीरयष्टी उत्तम राहील यासाठी विद्यार्थी मेहनत घेत होते. दोन्ही विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. यासोबतच तृतीय वर्गाची परीक्षा दिलेला



विद्यार्थी रीतेश टोमके याची पूणे पोलिस दलात निवड झाली आहे. हे तिन्हीही विद्यार्थी एनसीसीचे कॅडेट असून यांनी एनसीसी (सी) प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, ग्रंथपाल संदीप गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी एनसीसी विभागप्रमुख डॉ. मुकुंद कवडे, डॉ.डी.एस यादव, प्रा. स्वाती काटे यांच्यासह इतर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# देगलूरमध्ये दगडाने जीवघेणा हल्ला;आरोपीला काही तासांत बेड्या

देगलूर/प्रतिनिधी-शहरातील कापड बाजारातील हनुमान मंदिर चौक परिसरात बुधवारी मध्यरात्री झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी देगलूर पोलिसांनी तत्पर कारवाई करत आरोपीला अवघ्या काही तासांत अटक केली. दगडाने डोक्यावर आणि चेहऱ्यावर वार करून एका तरुणाच्या खुनाचा प्रयत्न करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

या प्रकरणी सौ. सावित्रा वडेटवार (वय ३७, रा. देगलूर) यांनी देगलूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जखमी शंकर हुसेन्ना आमृतवार (वय २९, मूळ रा. सुलतानपेठ, ता. मदनूर, जि. कामारेड्डी, सध्या रा. देगलूर) हा त्यांचा सख्खा भाऊ असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जून रोजी रात्री सुमारे ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान प्रकाश गज्जलवार (रा. सांगवी (क), ता. देगलूर) याचा शंकर आमृतवार याच्याशी किरकोळ कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर संतप्त झालेल्या प्रकाश गज्जलवार याने दगडाने शंकरच्या डोक्यावर व चेहऱ्यावर वार करत गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.दरम्यान, गस्तीवर असलेल्या देगलूर पोलिसांच्या पथकाला हनुमान चौक परिसरात एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. पोलिसांनी तातडीने जखमी शंकर आमृतवार याला देगलूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्याला पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. त्याच्या प्रकृतीबाबत अद्याप अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.घटनेचा तपास करताना पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामध्ये प्रकाश गज्जलवार हा शंकर आमृतवार याच्यावर दगडाने हल्ला करत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. या आधारे आरोपीची ओळख पटवून पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली आणि काही तासांतच त्याला अटक करण्यात यश मिळविले.या घटनेमुळे देगलूर शहरात एकच खळबळ उडाली असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# प्रा.डॉ.माधव वाघमारे यांना जीवन गौरव पुरस्कार

नांदेड/प्रतिनिधी-सामाजिक परिवर्तन, वैचारिक प्रबोधन आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. माधव शंकर वाघमारे यांना प्रतिष्ठेचा लोकनेते क्रांतीसम्राट संघर्षनायक डॉ. बाबासाहेब गोपले जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. ४ जून २०२६ रोजी मुंबईतील मानखुर्द येथे आयोजित सोहळ्यात अखिल भारतीय मातंग सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा कुसुमताई गोपले यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. मूळचे डोणगाव खुर्द (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील डॉ. वाघमारे हे सध्या नंदुरबार येथील जी. टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या बारा वर्षांपासून त्यांनी अध्यापनासोबतच संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय आणि समतावादी विचारांचा प्रचार-प्रसार केला आहे.त्यांच्या वैचारिक लेखन, प्रबोधनपर व्याख्याने आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.

# माहूर येथे श्रीमद् संगीतमय भागवत कथा सप्ताहास प्रारंभ

माहूर/प्रतिनिधी-श्री दत्तात्रय संस्थान माहूरगडाचे महंत डॉ. धनेश्वर भारती यांच्या कृपाशीर्वादाने मंगळवारी (दि.९) माहूर येथील श्री कपिलेश्वर मंदिर येथे श्रीमद् संगीतमय भागवत कथा सप्ताहास भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. अधिक मासानिमित्त आयोजित या धार्मिक सोहळ्यात दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीमद् संगीतमय भागवत कथा, सायं.५ ते ६ हरिपाठ तसेच रात्री ८ ते १० कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.

सप्ताहाच्या पहिल्या दिवशी माहूर व परिसरातील गुरुदेव सेवा भजनी मंडळाच्या भजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.बुधवारी (दि. १० जून) गायत्रीताई चाटे यांच्या बाल कीर्तनकारांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवारी (दि. ११ जून) पंकजाताई डोईफोडे, शुक्रवारी (दि.१२ जून) कल्पनाताई हिरासिंग ठाकूर, शनिवारी (दि.१३ जून) अनुपमाताई आळंदीकर आणि रविवारी (दि. १४ जून) ओमसतीताई कानोजवार यांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. सोमवारी (दि.१५ जून) व्यसनमुक्ती सम्राट मधुकर महाराज खोडे यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादास प्रारंभ होईल. तसेच सप्ताहाची सांगता शके १९४८ अधिक ज्येष्ठ अमावास्या, सोमवार (दि. १५ जून) रोजी शारदासुत खामनकर महाराज यांच्या शिदोरी काला व भागवत कथेद्वारे होणार आहे. याचबरोबर श्रीक्षेत्र माहूर ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा २ जुलै रोजी स. १०.३० वाजता कपिलेश्वर मंदिरातून प्रस्थान करणार आहे. या श्रीमद् संगीतमय भागवत कथा सप्ताहाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन सर्व गावकरी, व्यापारी मंडळी, गणेशोत्सव मंडळ, शारदामाता उत्सव मंडळ, दुर्गामाता उत्सव मंडळ तसेच श्रीक्षेत्र माहूर येथील आयोजकांनी केले आहे.

# आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकून सार्वजनिक उपद्रव पसरविणाऱ्या युवकाविरुध्द मरखेल पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली आहे.

मरखेल पोलिस स्टेशनच्या हद्दीत राहणारा वाजिद बंदुसाब चौधरी (वय ३३, रा.हाणेगाव, ता.देगलूर) याने दोन समाजात तेढ निर्माण होईल या आशयाचा व्हिडिओ तयार करुन इन्स्ट्राग्राम व फेसबुक या सोशल मिडियावर प्रसारीत केला होता. या प्रकरणाची दखल घेवून मरखेल पोलिस ठाण्यातील सपोनि रवी हुंडेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी वाजीद याच्या विरुध्द कलम ३५३ (२), २९६, ३५१ (२) भान्यासं. प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी वाजिद याला अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले.

